## <u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१ सन २०१८ निशाणी १ वरील आदेश</u>

सीएनआर क्र. एमएचएएच०९-००००01-२०१८

१. अर्जदार राहुल साहेबराव गागरे यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे मालकीचा ट्रॅक्टर नोंदणी क्र. एमएच-१७-सी-३५९७, चेसीज क्रमांक ED-19504 व इंजिन क्र. ED-19504 व एल.एम.व्ही. कंपनीचा ट्रेलर चेसीज क्रमांक TAN/070/2012 हा मुद्देमाल ताब्यात मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

<u>अर्जातील कथन थोडक्यात खालील प्रमाणे</u> :-

२. अर्जदाराचे म्हणण्यानुसार त्यांनी शेती व्यवसायासाठी सदरचा ट्रॅक्टर व ट्रेलर खरेदी केलेला असून तो घारगांव पोलीस ठाणे, ता. संगमनेर यांनी गुन्हा नोंदणी क्र. I-१२७/२०१७ मध्ये जप्त केलेला आहे. अर्जदारास सदर ट्रॅक्टर व ट्रेलर त्यांना शेती व्यवसायासाठी आवश्यक आहे. अर्जदाराने पुढे असेही कथन केले आहे की, सदर ट्रॅक्टर व ट्रेलर घारगांव पोलीस ठाणे, ता. संगमनेर येथे पडून राहिल्यास सदर वाहनाचे टायर, टयुब, बॅटरी, इंजिन इत्यादीचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. सदर वाहन त्याचे ताब्यात दिल्यास तो न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे सर्व अटी-शर्तीचे पालन करील, खटल्याचा निकाल लागेपावेतो सदर वाहनाचे स्वरुपात बदल करणार नाही, तसेच तो न्यायालयाच्या हुकूमाप्रमाणे योग्य त्या रकमेचा बंधपत्र देण्यास तयार आहे.

३. सदरच्या अर्जावर सरकारी वकीलांनी आक्षेप घेतला की, अर्जदार हा केसमधील आरोपी असून परत अशा प्रकारच्या गुन्हयांमध्ये जप्त मुद्देमालाचा वापर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सुनावणीच्या वेळेस सदर मुद्देमाल न्यायालयात हजर असणे आवश्यक आहे. जप्त करण्यात आलेला ट्रॉली ही विना नोंदणी क्रमांकाची आहे. अर्जदार सदर मुद्देमालाच्या मुळ स्वरुपात बदल किंवा नष्ट करण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच गुन्हयाची गंभीरता, मुद्देमालाचा गुन्हयातील वापर व तपासाची सद्यस्थिती बघता अर्जदारास सदर मुद्देमाल परत करु नये अशी त्यांनी विनंती केली. तसेच तपासी अंमलदार यांनी नि.५ व नि.६ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन असे नमूद केले की, अर्जदाराचा महिंदा ट्रॅक्टर नोंदणी क्र. एमएच-१७-सी-३५९७ व विना नोंदणी क्रमांकाची ट्रॉली आरोपींनी गुन्हयात अवैद्य गौण

खनिज उपसा करण्यासाठी वापरण्यात आलेने सदरचे वाहन हे गुन्हयातील महत्वाचा पुरावा आहे. जप्त वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास आरोपीकडून पुन्हा अशा प्रकारचे गुन्हे घडण्याची शक्यता आहे. अर्जदाराच्या वाहनाचा पुन्हा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्जदार सदर वाहन न्यायलायात किंवा पोलीसात हजर करण्याची शक्यता नाही. सबब अर्जदारास जप्त मुद्देमाल परत करु नये अशी त्यांनी विनंती केली.

४. अर्जदाराने त्याचे कथनाचे समर्थनार्थ प्रस्तुतचे अर्जासोबत प्रतिज्ञापत्र सादर केले असून सदर वाहने त्यांचे मालकीचे आहेत हे दाखविण्यासाठी ट्रॅक्टरचे आर.सी. बुक व ट्रेलर खरेदी केल्याची पावतीची प्रमाणित प्रत आणि सदर ट्रॅक्टर ट्रेलर क्र. TAN/070/2012 एक फॉर्म प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत दाखल केली आहे.

५. दोन्ही बाजूच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. सदर प्रकरणातील कागदपत्राचे अवलोकनार्थ असे दिसून येते की, सदर गुन्हयातील मुद्देमाल - ट्रॅक्टर व ट्रेलर हे अर्जदाराच्या मालकीचे आहेत. सदर वाहन पोलीस ठाण्यामध्ये उघडयावर पडून राहिल्यास राहिल्यास राहिल्यास, ऊन, धूळ, पाऊस यामुळे सदर वाहनाचे स्पेअरपार्ट व मशिन खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय, अर्जदारा व्यतिरिक्त सदर मुद्देमालाची कोणीही मागणी केली नाही. या सर्व बाबींचा सारासार विचार करता, गुन्हयातील जप्त मुद्देमाल ट्रॅक्टर व ट्रेलर हे काही अटी व शर्तीच्या सुपूर्दनाम्यावर अर्जदाराचे ताब्यात देणे मला वावगे वाटत नाही, म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. ट्रॅक्टर नोंदणी क्र. एमएच-१७-सी-३५९७, चेसीज क्रमांक ED-19504 व इंजिन क्र. ED-19504 हा रक्कम रु.१०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. दहा लाख मात्र) चे बंधपत्र लिहून घेवून सदर आदेशातील अ ते ड मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार राहुल साहेबराव गागरे यांच्या ताब्यात द्यावा.

३. एल.एम.व्ही. कंपनीचा ट्रेलर चेसीज क्रमांक TAN/070/2012 हा रु.१०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. दहा लाख मात्र) चे बंधपत्र लिहून घेवून खालील अटी व शर्तीनुसार अर्जदार उराहुल साहेबराव गागरे यांच्या ताब्यात द्यावा.

अ. अर्जदाराने सदर वाहनांमध्ये कोणतेही बदल, त्याचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण तसेच, विक्री करु नये अथवा इतर कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावू नये.

ब. अर्जदाराने सदर वाहनांचे दोन रंगीत छायाचित्र काढून या न्यायालयात दाखल करावे.

क. न्यायालय आदेश देईल त्या-त्या वेळी अर्जदाराने सदरचे वाहन न्यायालया समक्ष हजर करावे.

ड. सदर वाहनांबाबत न्यायालयाने दिलेल्या प्रत्येक आदेशाचे अर्जदाराने काटेकोरपणे पालन करावे.

३. वरील अटी व शर्तीचा अर्जदाराकडून भंग झाल्यास त्याचे बंधपत्र जप्त करण्यात येईल व त्याचेकडून बंधपत्रातील रक्कम वसूल करण्यात येईल.

४. सदर गुन्हयाचा तपास अधिका-यांना आदेश देण्यात येतो की, त्यांनी सदर वाहनांचा सविस्तर पंचनामा तयार करुन तो दोषारोपपत्रा सोबत दाखल

५. सदर आदेशाची प्रत मुळ खटल्या सोबत ठेवावी.

६. याबाबत संबंधित पोलीस ठाण्यात यादी पाठवावी.

सही /- XXX
(सं.क. कारंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२), संगमनेर.

दिनांक : १०/०१/२०१८